MHAU120004682022

नियमित दिवाणी दावा क्र.–९३/२०२२
नागो वि. कृष्णा

## निशाणी–१७ खाली आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला, लेखी जवाब नाही हा दि. १३.०६.२०२३ रोजीचा आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादींचे असे कथन आहे की, काही कागदपत्र त्यांना वेळेत मिळु न शकल्याने विहित मुदतीत लेखी जबाब दाखल करता आला नाही. सबब, त्यांच्या विरुध्द दि. १३.०६.२०२३ रोजी लेखी जबाब नाही असा आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादींचा लेखी जबाब पटलावर न घेतल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा खोटा आहे. केवळ दावा विलंबावर टाकण्याकरीता सदर अर्ज दाखल केला आहे. अर्जात कोणतेही कारण नमुद केले नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती वादीने केली.

**०४.** प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादींविरुध्द विना लेखी जबाब हा आदेश दि.१३.०६.२०२३ रोजी पारित केलेला आहे. तदनंतर सुमारे चार महिन्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. विलंबाचे नमुद केलेले कारण योग्य नाही. मात्र, लेखी जबाब पटलावर न घेतल्यास दाव्याचा निर्णय गुणांवर होणार नाही. सबब, प्रतिवादींचा लेखी जबाब पटलावर असणे आवश्यक

आहे. झालेल्या विलंबाकरिता प्रतिवादींना रक्कम रुपये २००/– कॉस्ट करणे उचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो –

## आदेश

**०१.** अर्ज रक्कम रुपये २००/– कॉस्ट वर मंजुर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादींविरुध्द झालेला लेखी जबाब नाही हा आदेश बाजुस सारण्यात येतो.

**०३.** सदर कॉस्ट प्रतिवादींनी वादीला दयावी.

**स्वाक्षरीत/–**

[आर.एन.पाठक]

दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,

सोयगांव.

**दिनांक : १८.०१.२०२४.**

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per original Order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K. P. Dusane. |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Soygaon. |
| Date | :- | 18.01.2024. |
| Order signed by presiding Officer on | :- | 18.01.2024. |
| Order uploaded on | :- | 18.01.2024. |